# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-२१२१/२०२२

**अपिलार्थी, ASHOK S. VERMA,**
**B-२२, MARUTIDHAM CO-OP. HSG.SOC.,**
**NEAR ESIC, ANAND NAGAR, VASAI ROAD (W),**
**TAL. VASAI, DIST. PALGHAR ४०१ २०२.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी (प्र.श्रे.), संलग्न उपनिबंधक, सहकारी संस्था, वसई, जॉनी क्रॉस लेन, तामतलाव, वसई (प), ता.वसई, जि.पालघर

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, वसई, जॉनी क्रॉस लेन, तामतलाव, वसई (प), ता.वसई, जि.पालघर

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ७.४.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १७.१.२०२२ | १४.२.२०२२ | २.३.२०२२ | १३.४.२०२२ |

अपिलार्थी यांनी दि.८.६.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "माहिती प्राप्त झाली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ७.४.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी ऑनलाईन उपस्थित आहेत. तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. संजय ठाकरे, सहकारी अधिकारी, श्रेणी-१, संलग्न उपनिबंधक, सहकारी संस्था, वसई हे समक्ष उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" (Details of entire proceedings & Orders conducted during the tenure of Shri. Yogesh Desai as dy.Registrar of Co-op. Societies, Vasai. ) "*

*"(i. List of all the cases filed by Housing societies under section १०१ or १५४ B-२९ of the Maharashtra Cooperative Societies Act, along with their name & address, Case No. date of fining date of hearing, date of order, copy of all orders, list of pending cases and reasons thereon.*

*ii. List of all applications initiated for transfer of share certificate in the name of new member where previous/past member has outstanding dues filing, date of hearing, date of order, Copy of all proceedings & orders.*

*iii. Details of all order implemented by Office of the Dy. Register Co-op. Hsg. Soc. Vasai till date with details along with documentary evidence after refusal to implant by concerned party.*

*iv. Details & order copy of all orders passed by the Dy. Registrar Coop. Societies Vasai for reversing the resolution passed by General Body of the respective Societies after following due process of Law)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थींनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१३.४.२०२२ रोजी सुनावणी घेऊन अपिल फेटाळण्यात येत आहे असे आदेश पारित केले आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी, जन माहिती अधिकरी व प्रथम अपिलिय अधिकारी यांना आजच्या सुनावणीची सूचना प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. सबब, प्रस्तुत प्रकरणी पुन्हा नोटीस काढण्यात यावी. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.३०.४.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.**

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ७ एप्रिल, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ,
दालन क्र. ५२७ व ५२८, ५ वा मजला,
कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ